# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय :– " भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसहाय्य" योजनेच्या अर्जास मुदतवाढ देणेबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. ७६/२०२५, दि. २३/०३/२०२५ अन्वये विद्यापीठ शैक्षणिक विभागात व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रावरील पीएच्. डी. प्रवेशप्रक्रिया पूर्ण करून **दि. ३१/०८/२०२१ ते दि. २१/०४/२०२५** या कालावधीमध्ये पीएच्. डी. अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने विद्यार्थ्यांकडून भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसहाय्य योजनेकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते.

भारतरत्न जे.आर.डी. टाटा अर्थसहाय्य योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील त्यांच्या Ph.D. Tracking Account मधून ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यास **दि. १५/०५/२०२५** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच यापूर्वी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत सर्व संबंधित कागदपत्रासहित तसेच मार्गदर्शक व मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य यांच्या शिफारशीसह (सही व शिक्का) **दि. २०/०५/२०२५** पर्यंत शैक्षणिक प्रवेश विभागात प्रत्यक्ष हस्तपोच सादर करावेत. सदर अर्जास मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य यांनी BOD लॉगीन मधून सदर अर्जास अप्रुव्हल देण्यात यावे. मुदतीनंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/१०७२
दिनांक : २१/०४/२०२५

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

प्रत :– माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग/मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था/ संशोधन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ.

सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

D/Vishnu/JRD TATA/TRD TATA Circular